**ठळक बातम्या**

- राज्यघटनेवरील लोकसभेतल्या चर्चेला उत्तर देताना प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी विकसित भारताचं स्वप्न साकार करण्यासाठी मांडले ११ संकल्प

- राज्य मंत्रीमंडळाचा उद्या संध्याकाळी नागपुरात विस्तार, तब्बल ३ दशकांनंतर नागपुरात होणार शपथविधी

- दक्षिण कोरियाचे अध्यक्ष यून सुक येओल यांच्याविरोधात संसदेत महाभियोग प्रस्ताव मंजूर

**आणि**

- बॉर्डर-गावस्कर चषक कसोटी मालिकेत तिसऱ्या सामन्याच्या पहिल्या दिवशी पावसामुळे केवळ १३ षटकांचा खेळ

**<><><><><>**

सन २०४७पर्यंत भारताला विकसित राष्ट्र म्हणून उभं करण्यासाठी प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी सर्व देशवासीयांना ११ संकल्पांचं पालन करण्याचं आवाहन केलं आहे.

सर्वांनीकर्तव्याचं पालन करणं, सर्वांच्या सहभागातून सर्वांचा विकास साधणं, भ्रष्टाचाराला अजिबात थारा न देणं, देशाच्या कायद्याचं अभिमानानं पालन करणं, गुलामगिरीच्या मानसिकतेतून बाहेर येणं, देशाचं राजकारण एकाच कुटुंबाच्या वर्चस्वातून मुक्त करणं, राज्यघटनेचा सन्मान करणं, राजकीय स्वार्थासाठी राज्यघटनेचा होत असलेला वापर थांबवणं, राज्यघटनेनं दिलेलं आरक्षण अबाधित ठेवणं, मात्र धर्माच्या आधारे आरक्षण

देण्याचे होणारे प्रयत्न थांबवणं, महिलाकेंद्रित विकासाचा आदर्श जगासमोर ठेवणं, राज्यांच्या विकासातून देशाचा विकास हा मंत्र अंगिकारणं आणि एक भारत, श्रेष्ठ भारत हेच सर्वोच्च उद्दिष्ट ठेवणं, हे ११ संकल्प त्यांनी राज्यघटनेवरच्या चर्चेला लोकसभेत उत्तर देताना सदनासमोर मांडले.

भारतातली विविधतेत सामावलेली एकता हे देशाला मिळालेलं एक वरदान असून देशाची राज्यघटना हाच देशाच्या एकतेचा आधार आहे, ही विविधता आपल्या जगण्याचा एक भाग व्हायला हवी, असं प्रतिपादन त्यांनी यावेळी केलं.

**बाईटः प्रधानमंत्री**

भारताला स्वातंत्र्य मिळालं, त्या वेळी देशाच्या भविष्याच्या ज्या शक्यता वर्तवण्यात आल्या, त्या सर्व खोट्या ठरवून भारताची राज्यघटनाच आपल्या देशाला इथपर्यंत घेऊन आली. राज्यघटनेचं तत्त्व देशातल्या कोट्यवधी नागरिकांच्या जगण्यात दिसून येतं, असं प्रतिपादन प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी केलं आहे.

भारतीय समाजव्यवस्थेत लोकशाही हजारो वर्षांपासून रुजलेली आहे, अशी ग्वाही त्यांनी घटनाकर्त्यांच्या मतांच्या आधारे दिली. घटना समितीतल्या १५ सक्रीय महिला सदस्यांनी राज्यघटनेच्या निर्मितीत दिलेल्या योगदानाचं स्मरण करून, इतर लोकशाही देशांमध्ये महिलांना अधिकार द्यायला कित्येक दशकं लागली, मात्र भारतात सुरुवातीपासूनच महिलांना मतदानाचा अधिकार होता, असं प्रधानमंत्र्यांनी नमूद केलं. ७५ वेळा घटनादुरुस्ती करण्यावरून त्यांनी काँग्रेसवर टीका केली. यावेळी त्यांनी विविध उदाहरणं देऊन काँग्रेसच्या आजी माजी नेत्यांवर टीका केली.

**<><><><><>**

भारतीय राज्यघटनाला ७५ वर्षे पूर्ण झाल्याबद्दल आजही लोकसभेत राज्य घटनेवर चर्चा करण्यात आली. विविध पक्षांच्या  खासदारांनी देशाच्या आतपर्यंतच्या वाटचालीवर आणि राज्यघटनाच्या महत्त्वावर आपले विचार मांडले. याविषयी अधिक जाणून घेऊया आमच्या प्रतिनिधीकडून…

**होल्ड व्हाइस कास्ट**

*संसदीय कार्यमंत्री किरेन रिजिजु यांनी भारतरत्न डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांच्या संविधान निर्मितीतल्या योगदानाबद्दल गौरवोद्गार काढले. राज्यघटनेनुसार देशातल्या प्रत्येक घटकाला समान अधिकार मिळाले आहेत. अल्पसंख्यकांबाबतही भेदभाव केला जात नाही, हे रिजिजु यानी अधोरेखित केलं.*

*भाजपा राज्यघटनेला कमकुवत करत आहे, अशी टीका लोकसभेतले विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांनी केली. गांधी यांनी बेरोजगारी, अग्नीवीर योजना, मक्तेदार भांडवलशाही, शेतकरी आणि महिलांवरील अत्याचार हे मुद्दे यावेळी उपस्थित केले. नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखालील सरकारच्या काळात राजकीय, सामाजिक आणि आर्थिक समता  नष्ट झाल्याचा आरोपही गांधी यांनी केला.*

*भाजपाचे खासदार अनुराग ठाकुर यांनी राहुल गांधींचे आरोप फेटाळून लावले. माजी प्रधानमंत्री इंदिरा गांधी यांनी देशात लागू केलेल्या आणीबाणीची आठवण करून देत ठाकुर यांनी काँग्रेसवर टीका केली.*

*द्रमुकचे खासदार ए राजा यांनी लोकशाही, कायदा, धर्मनिरपेक्षता आणि समता या संदर्भातले मुद्दे उपस्थित केले. यावेळी राजा यांनी सत्ताधारी पक्षावर कठोर शब्दात टीका केली. तर काँग्रेसने राज्यघटनेचा वापर काँग्रेसने मतपेढी वाढवण्यासाठी केल्याची टीका शिवसेनेचे खासदार श्रीकांत शिंदे यांनी केला.*

*केंद्र सरकार आपल्या धोरणाद्वारे देशात आर्थिक असमतोल निर्माण करत असल्याचा आरोप भाकप एमएलचे खासदार राजा राम सिंह यांनी केला. तर भारतीय  राज्यघटनेत समाविष्ट असलेल्या मुल्यांची अंमलबजावणी झाली आहे की नाही याचं आत्मपरीक्षण करण्याची गरज आरएसपीचे खासदार एन के प्रेमचंद्रन यांनी व्यक्त केली.*

*आकाशवाणी बातम्यांसाठी वृत्त विभागातून संदेश नाईक*

**<><><><><>**

राज्यातल्या नवनिर्वाचित सरकारच्या मंत्रिमंडळाचा विस्तार उद्या रविवारी सायंकाळी चार वाजता नागपूर इथं राजभवनात होणार आहे. येत्या सोमवारपासून राज्य विधीमंडळाचं हिवाळी अधिवेशन नागपुरात होत आहे. त्याच्या पूर्वसंध्येला हा मंत्रिमंडळ विस्तार केला जाणार आहे. याविषयी अधिक जाणून घेऊया आमच्या प्रतिनिधीकडून…

**होल्ड व्हाइस कास्ट**

*मंत्रिमंडळ विस्तारात महायुतीचे एकूण ४० आमदार मंत्रीपदाची शपथ घेण्याची शक्यता आहे. त्यात भाजपच्या २१, शिवसेनेच्या १२ आणि राष्ट्रवादी काँग्रेसच्या १० आमदारांना मंत्रिपदे दिले जाण्याची शक्यता वृत्तसंस्थेनं वर्तवली आहे. विधानसभा निवडणुकीत भाजपाचे १३२, शिवसेनेचे ५७ आणि राष्ट्रवादीचे ४१ आमदार निवडून आले आहेत. मंत्र्यांची यादी भाजपच्या केंद्रीय नेतृत्वाकडे पाठवली आहे. तिथून मंजुरी मिळाल्यानंतर संबंधित आमदारांना सूचित केलं जाईल, अशी माहिती भाजपा नेत्यांनी वृत्तसंस्थेला दिली. मुख्यमंत्री म्हणून देवेंद्र फडणवीस आणि एकनाथ शिंदे आणि अजित पवार यांनी उपमुख्यमंत्री पदाची शपथ घेतल्यानंतर १० दिवसांनी मंत्रीमंडळ विस्तार होतो आहे.*

*मंत्रिमंडळ विस्तार नागपुरात होण्याची ही १९९१ नंतरची पहिलीच वेळ आहे. १९९१ मध्ये तत्कालीन मुख्यमंत्री सुधाकरराव नाईक यांच्या मंत्रिमंडळाचा विस्तार नागपूर येथे झाला होता. त्यावेळी छगन भुजबळ यांनी कॅबिनेट मंत्रिपदाची शपथ घेतली होती. तेव्हा मंडल आयोगाच्या अहवालावरून भुजबळांनी शिवसेनेतून बाहेर पडून काँग्रेसमध्ये प्रवेश केला होता.*

*आकाशवाणी बातम्यांसाठी वृत्तविभागातून मनिषा देवणे.*

<><><><><>

शेतपिकाला हमीभाव देण्याचा कायदा आणि कर्जमाफी या प्रमुख मागण्यांसाठी पंजाबमधल्या शेतकऱ्यांनी काढलेला ‘दिल्ली चलो’ मोर्चा आज पुन्हा एकदा स्थगित करण्यात आला. मोर्चेकरी जमावाने शंभू तपासणी नाका ओलांडण्याचा प्रयत्न करीत असताना हरियाणा पोलिसांनी जमाव पांगवण्यासाठी अश्रुधूर आणि पाण्याच्या फवाऱ्यांचा वापर केला. त्यात काही शेतकरी जखमी झाल्यामुळे हा निर्णय घेतल्याचं सूत्रांनी सांगितलं. दरम्यान या आंदोलनाचा भाग म्हणून गेले १८ दिवस उपोषण करणारे शेतकरी नेते जगजीत सिंग दल्लेवाल यांना वैद्यकीय सहाय्य देण्याचे निर्देश सर्वोच्च न्यायालयाने दिले आहेत. शंभू तपासणी नाक्यावरील या आंदोलनामुळे अंबाला जिल्ह्यात कडेकोट सुरक्षा व्यवस्था करण्यात आली आहे. तसंच आजपासून १७ डिसेंबरपर्यंत इंटरनेट सेवा बंद करण्यात आली आहे.

<><><><><>

दक्षिण कोरियाचे अध्यक्ष यून सुक येओल यांच्याविरोधात संसदेत महाभियोग प्रस्ताव आज मंजूर झाला. हा प्रस्ताव २०४ विरुद्ध ८५ मतांनी संसदेत मंजूर झाला. यानंतर सर्वोच्च न्यायालय त्यांना पदच्युत करायचे किंवा पदावर ठेवायचे यावर हे निश्चित करेल. घटनात्मक न्यायालयाने राष्ट्राध्यक्ष यून सुक येओल यांना पदच्युत केलं तर साठ दिवसांच्या आत राष्ट्राध्यक्षपदाची निवडणूक घेणं बंधनकारक आहे. त्यांना पदच्युत केलं तर महाभियोगाद्वारे पदच्युत झालेले येओल हे दक्षिण कोरियाचे दुसरे राष्ट्राध्यक्ष ठरतील. न्यायालयाच्या निर्णयापर्यंत यून सुक येओल यांचे

राष्ट्राध्यक्षपदाचे अधिकार काढून घेण्यात आले आहेत. या काळात प्रधानमंत्री हान डक सू हे कार्यवाहक अध्यक्ष म्हणून काम पाहतील. येओल यांच्यावर देशद्रोहाच्या आरोपाखाली खटला सुरू असून त्यांना देश सोडायला बंदी घालण्यात आली आहे.

**<><><><><>**

जॉर्जियाचे नवे अध्यक्ष म्हणून मिखाईल कवेलाशविली बिनविरोध निवडून आले आहेत. २२५ पैकी २२४ खासदारांनी त्यांना मतदान केलं. २९ डिसेंबर रोजी त्यांचा शपथविधी होईल. ऑक्टोबरमध्ये झालेल्या निवडणुकांमध्ये घोटाळा झाल्याचा आरोप करत विरोधी पक्षांनी संसदेवर बहिष्कार टाकला आहे.

**<><><><><>**

भारत आणि ऑस्ट्रेलिया दरम्यान ऑस्ट्रेलियात गॅबा इथं सुरु असलेल्या बॉर्डर-गावस्कर चषक कसोटी क्रिकेट सामन्यांच्या मालिकेतल्या तिसऱ्या सामन्यात आज पहिल्या दिवसाचा खेळ थांबला तेव्हा ऑस्ट्रेलियानं बिनबाद २८ धावा केल्या होत्या. उस्मान ख्वाजा १९ तर नॅथन मॅकस्विनी ४ धावांवर खेळात होते. इथं वारंवार होत असलेल्या पावसाच्या व्यत्ययामुळे आज दिवसभरात केवळ १३ षटकं आणि २ चेंडू एवढाच खेळ झाला. त्याआधी, भारतानं नाणेफेक जिंकून क्षेत्ररक्षण स्विकारलं.

या मालिकेत आतापर्यंत झालेल्या सामन्यांपैकी पहिल्या सामन्यात भारताला २९५ धावांनी विजय मिळाला तर दुसरा सामना ऑस्ट्रेलियानं दहा

गडी राखून जिंकला. दरम्यान, आजच्या दिवसाची भरपाई करण्याकरता उद्याच्या दिवसाचा खेळ अर्धा तास लवकर सुरु करण्यात येणार आहे.

//<><><><><>//